# महाराष्ट्र शासन

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

## समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, पुणे-४११००१

ई-मेल - fs.directorsw@gmail.com दूरध्वनी क्र. ०२०-२६१२७५६९/२६१३७१८६

**अनुसूचित जातीच्या मुला-मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती सन २०२१-२०२२**
**परदेशामध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळालेल्या महाराष्ट्रातील अनुसूचित जाती, नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशामध्ये उच्च शिक्षणासाठी मिळावयाच्या परदेश शिष्यवृत्ती निवडीसाठी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून अर्ज मागविण्यात येत आहे.**

### योजनेच्या अटी व शर्ती

- विद्यार्थी अनुसुचित जाती, नवबौद्ध घटकातील असावा.
- विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
- पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ३५ वर्षे व पीएचडीसाठी ४० वर्षे ही कमाल वयोमर्यादा असेल.
- विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ६ लाखापेक्षा जास्त नसावे.
- जागतिक क्रमवारीमध्ये पहिल्या १०० विद्यापीठामध्ये व LONDON SCHOOL OF ECONOMICS मध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना उत्पन्न मर्यादा लागू नाही.
- परदेशातील शिक्षण संस्थेत प्रवेश घेणाऱ्या वा प्रवेशित असलेल्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येईल ; परंतु द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना पूर्ण केलेल्या अभ्यासक्रम कालावधीची शिष्यवृत्ती अनुज्ञेय असणार नाही. परदेश शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत दोन वर्षे कालावधीचाच MBA अभ्यासक्रम अनुज्ञेय राहील.
- भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या संकेतस्थळावरील MD व MS अभ्यासक्रमच प्रवेशासाठी पात्र असतील.
- यापूर्वी शासनाकडून परदेश शिष्यवृत्तीअंतर्गत ज्या विद्यार्थ्यांनी परदेशात पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी योजनेचा लाभ घेतलेला आहे असे विद्यार्थी देखील पीएचडी अभ्यासक्रमासाठी अर्ज करण्यास पात्र असतील.
- परदेशातील शिक्षण संस्था ही जागतीक क्रमवारीत (QX World University Rank) ३०० च्या आत असावी.
- एखाद्या शाखेतील विद्यार्थ्यास परदेशातील विद्यापीठाने शासनाने अनुज्ञेय केलेल्या अन्य शाखेअंतर्गत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला असल्यास सदर प्रवेश योजनेंतर्गत लाभासाठी ग्राह्य धरण्यात येईल.
- अटी व शर्ती ह्या सविस्तर जाहिरातीप्रमाणे व शासननिर्णयानुसार लागू राहतील.
- सदरील वेबसाईटवरून अर्ज डाऊनलोड करून तो परिपूर्ण व आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक : १४/०६/२०२१ पर्यंत सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत swfs.applications.2122@gmail.com या ई-मेलवर पाठवून त्याची हार्डकॉपी पोस्टाने समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च रोड, पुणे-४११००१ येथे सादर करावा.

### योजनेतील लाभाचे स्वरूप

- विद्यापीठाने प्रमाणित केलेल्या शिक्षण फीची पूर्ण रक्कम तसेच केंद्र शासनाच्या नॅशनल ओव्हरसीज शिष्यवृत्ती (National Overseas Scholarship) योजनेअंतर्गत लागू करण्यात आलेली इतर फी (Other Fees) (अ) आरोग्य विमा (Health Insurance) आणि (ब) व्हिसा शुल्क (Visa Fees) या बाबी परदेश शिष्यवृत्तीधारकांसाठी अनुज्ञेय असतील.
- विद्यार्थ्यास वार्षिक निर्वाह भत्ता अमेरिका व इतर राष्ट्रांसाठी यु.एस. डॉलर १५,४०० तर यु.के. साठी जी.बी. पौंड ९९०० इतका अदा करण्यात येतो.
- विद्यार्थ्यास परदेशातील विद्यापीठामध्ये प्रवेश घेणेसाठी आणि अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर भारतात परत येण्यासाठी कमीत कमी कालावधीचा आणि नजीकच्या मार्गाचा (Shortest Route) दराचा Economy Class (इकॉनॉमी क्लास) चा विमान प्रवासाचा दर दिला जाईल.
- विद्यार्थ्याला आकस्मिक खर्चासाठी यु.एस.ए. व इतर देशांसाठी यु.एस. डॉलर १५०० तर यु.के. साठी जी.बी. पौंड १,१०० इतके देण्यात येतात. यामध्ये पुस्तके, अभ्यासदौरा व इतर खर्चासा समावेश आहे.

- सध्या कोविड १९ या सांसर्गिक रोगाचा जगभरात झालेला प्रादुर्भाव लक्षात घेता कोणतेही कारण न देता सदर योजनेची जाहिरात रद्द करणे, निवड/प्रवेश प्रक्रिया पुढे ढकलणे यासह योजनेच्या अंमलबजावणीबाबतचे सर्व अधिकार शासन स्वतःकडे राखून ठेवत आहे. तसेच नजिकच्या काळात योजनेअंतर्गत पालकांच्या कुटुंबाच्या उत्पन्न मर्यादेत तसेच जागांमध्ये वाढ झाल्यास त्यानुसार जाहिरातीमध्ये आवश्यक ते बदल करण्याचे, सुधारणा करण्याचे व फेरअर्ज मागविण्याचे अधिकार शासन राखून ठेवीत आहे.

अर्जाचा नमुना व अधिक सविस्तर माहितीसाठी पुढील संकेतस्थळाला भेट द्यावी.
(A) www.maharashtra.gov.in येथे रोजगार या लिंकवर.

स्थळ : पुणे
दिनांक : ११/०५/२०२१

स्वा/-
आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

DGIPR-2021-22/486